## नियमित दिवाणी दावा क्रमांक ७५९/२०२२ मधील नि.क्र.१९ वरील आदेश

(CNR No.MHAH250025442022)

प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जाद्वारे त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना उलटतपास आदेश रद्दबातल होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन असे आहे की, सदर प्रतिवादीविरुध्द विना उलटतपास आदेश पारीत झाला आहे. वादीचा उलटतपास न घेतल्यास प्रतिवादीचे फार मोठे नुकसान होईल व मिळकतीपासुन वंचीत रहावे लागेल. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना उलटतपास आदेश रद्द होवुन मिळण्यासाठी त्यांनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, अर्जात उलटतपास का घेता आला नाही याचे एकही कारण अर्जात नमुद नाही. सबब अर्ज नामंजुर करावा. मंजुर करावयाचा झाल्यास हेवी कॉस्टचा आदेश व्हावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द जाहीर ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केला असुन वादीने दि.२३/६/२०२५ रोजी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले होते व प्रतिवादीविरुध्द दि.२२/९/२०२५ रोजी विना उलटतपास आदेश पारीत झाला होता. प्रस्तुत अर्ज आज दि.२७/१०/२०२५ रोजी दाखल केला आहे. कागदपत्रांचे अवलोकन करता प्रतिवादीनी दिलेले अर्जातील कारण संयुक्तिक नसले तरी सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीला उलटतपास घेण्याची संधी दिल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी याने केलेल्या विलंबाचा विचार करता वादीला खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

### आ दे श

१. प्रतिवादी याने रक्कम रुपये रु.३००/- वादीला खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२.	प्रतिवादी याने खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.10.31 11:22:16 +0530

(डॉ.एन.एस. सबनीस)

दिनांकः– २७/१०/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

पारनेर.